बुधवार, २२ सप्टेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ६५
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

अंतरंग

दिवाळीपासून नवी मुंबईतून जलप्रवासी वाहतूक/२
कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त लेख/४
भारताच्या मिताली राजने रचला नवा इतिहास/६

## ‘एनडीए’मध्ये महिलांना प्रवेश देण्यासाठी प्रक्रिया सुरू



**नवी दिल्ली :** राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे (एनडीए) द्वार मुलींसाठी खुले झालेले असून आता महिला व मुलींना मे-२०२२मध्ये होणारी प्रवेश परीक्षा देता येणार आहे. केंद्र सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी (दि. २१) ही माहिती देण्यात आली. सरकारकडून एनडीएमध्ये महिला कॅडेट्सच्या प्रवेशासाठी काय तयारी सुरू आहे याबाबत न्यायालयास अवगत करण्यात आले. सरकारकडून सांगण्यात आले की, योग्य वैद्यकीय आणि शारीरिक फिटनेस स्टॅण्डर्ड्सची मानके निर्धारित करण्याच्या प्रक्रियेत आहेत. वय आणि प्रशिक्षणाचे स्वरूप लक्षात घेऊन नियम बनवले जात आहेत. याचबरोबर आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. पुरुष व महिला कॅडेट्स यांच्या निवासस्थानाची स्वतंत्र व चांगल्या प्रकारे सोय केली जात आहे.

# अनंत गीतेंच्या वक्तव्याचे पडसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

**माजी केंद्रीय मंत्री आणि शिवसेना नेते अनंत गीते यांनी महाविकास आघाडी सरकारवरून केलेल्या वक्तव्याचे राज्याच्या राजकारणात जोरदार पडसाद उमटले आहेत. विविध पक्षांच्या नेत्यांनी यावर आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन गीतेंवर टीका केली. यानिमित्ताने रायगड जिल्ह्यातील शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस खासकरून अनंत गीते विरुद्ध सुनील तटकरे असा जुना राजकीय वाद पुन्हा एकदा डोके वर काढू लागल्याचे दिसत आहे.**



लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर काही काळ शांत झालेले अनंत गीते पुन्हा रायगडच्या राजकारणात सक्रिय झाले आहेत. श्रीवर्धन येथे त्यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. २०) झालेल्या मेळाव्यात राष्ट्रवादीचे माजी जि. प. सदस्य अविनाश कोळंबकर यांच्यासह अनेकांनी शिवसेनेत घरवापसी केली. या वेळी गीते यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर सडकून टीका केली. **(पान २ वर..)**

## गीते बरोबर बोलले -नाना पटोले



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अनंत गीते यांचे महाविकास आघाडीबाबतचे वक्तव्य योग्यच असल्याचे म्हटले आहे. पटोले म्हणाले, महाविकास आघाडी ही त्या वेळच्या राजकीय परिस्थितीनुसार तयार झाली. त्यामुळे गीतेंच्या या वक्तव्याचे आम्ही समर्थन करतो. हे बरोबरच आहे. गीते काही चुकीचे बोलले नाहीत.

## वैफल्यग्रस्त भावनेतून गीतेंचे वक्तव्य -सुनील तटकरे



**मुंबई :** अलीकडच्या काळात अनंत गीते यांची राजकीय अवस्था सांगताही येत नाही आणि सहनही होत नाही अशी झाली आहे. त्यामुळे अशा भावनेतून त्यांचे हे वैफल्यग्रस्त उद्‍गार आले आहेत, असे प्रत्युत्तर राष्ट्रवादीचे नेते खासदार सुनील तटकरे यांनी मंगळवारी (दि. २१) पत्रकार परिषदेत दिले. गीते बोलल्याने काही फरक पडत नाही. सूर्यावर थुंकण्याचा हा प्रकार आहे. शरद पवार हे देशाचे नेते आहेत, आघाडीचे जनक आहेत. अडगळीत पडलेल्या लोकांना त्या गोष्टीचे भान राहिले नसेल. म्हणून त्या नैराश्येपोटी आलेली ती वक्तव्ये असू शकतील, असेही तटकरे या वेळी म्हणाले.

## गीतेंचे वक्तव्य सत्य परिस्थितीवर आधारित -देवेंद्र फडणवीस



माजी केंद्रीय मंत्री आणि शिवसेना नेते अनंत गीते यांनी केलेले वक्तव्य सत्य परिस्थितीवर आधारित आहे. अशी अनैसर्गिक आघाडी कधी चालू शकत नाही. मी तर पहिल्यापासून सांगतोय ही अनैसर्गिक युती आहे. यांचे सरकार नीटपणे चालू शकत नाही, असे विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. गीतेंच्या विधानावर भाजप नेते व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही प्रतिक्रिया दिली. संजय राऊत हे शिवसेनेचे की राष्ट्रवादीचे यावर पीएचडी करावी लागेल. राऊत हे उद्धव ठाकरेंचे जेवढे कौतुक करत नाहीत त्यापेक्षा ते जास्त शरद पवारांचे कौतुक करतात, पण मी हमखास सांगतो, शिवसेनेच्या कोणत्याही मंत्र्यांची, कोणत्याही नेत्याची, कार्यकर्त्याची नार्को टेस्ट करा, त्यातून एकच आवाज बाहेर येईल, काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत शिवसेनेने जाणे म्हणजे हे पोलिटिकल सुसाईड आहे, असे मुनगंटीवार म्हणाले.

**महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यापासून राष्ट्रवादी काँग्रेस ज्या पद्धतीने शिवसेनेला दाबून किंबहुना दबाव टाकून पक्षाचा विस्तार करतेय आणि शिवसेनेला नुकसान पोहचतेय या सगळ्या गोष्टींची घुसमट, त्या वेदना, संवेदना, भावना अनंत गीते यांच्या वक्तव्यामधून बाहेर आल्यात.**
**-प्रवीण दरेकर,**
**विरोधी पक्षनेते, विधान परिषद**

## राज्यातील महिला सुरक्षेप्रश्नी दोन दिवसांचे अधिवेशन घ्या!

### राज्यपालांचे मुख्यमंत्र्यांना निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी मुंबईच्या साकीनाका परिसरात झालेल्या बलात्कार प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली होती. त्या पार्श्वभूमीवर आता राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना दोन दिवसीय विशेष अधिवेशन घेण्याचे निर्देश दिले आहेत.

या अधिवेशनात राज्यातील महिलांची सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात यावी, असे राज्यपाल कोश्यारी यांनी ठाकरे सरकारला सांगितले आहे. या संदर्भात राज्यपालांनी पत्र पाठवून मुख्यमंत्र्यांना निर्देश दिले आहेत.

## महिलांवरील वाढत्या अत्याचारांकडे ठाकरे सरकारचे दुर्लक्ष -चित्रा वाघ



**मुंबई :** साकीनाका बलात्कार आणि हत्या प्रकरणावरून दोन दिवसांचे अधिवेशन बोलवण्याचे निर्देश राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांना दिले. यावर मुख्यमंत्र्यांनी महिला सुरक्षेचा विषय राष्ट्रव्यापी आहे, असे सांगत राज्यपालांना पत्र दिले. मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना लिहिलेल्या पत्रामुळे भाजप महिला मोर्चा आक्रमक झाला असून प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या नेतृत्वात मंत्रालयासमोर आंदोलन करण्यात आले. या वेळी आमदार भारती लव्हेकर आणि आमदार मनीषा चौधरीही उपस्थित होत्या.

राज्यात महिला व मुलींवर अत्याचाराच्या घटना वाढत असताना राज्यातील महिलांनी राज्यपालांकडे ज्या भावना पोहचवल्या होत्या त्याला मुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर अतिशय दुर्दैवी आहे. राज्यातील पीडितांची थट्टा उडवण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. याचा निषेध म्हणून मुख्यमंत्र्यांच्या पत्राची होळी केल्याचे चित्रा वाघ यांनी या वेळी सांगितले. इतर राज्यांचे दाखले देत असताना आपल्या राज्यात महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. ही शिवशाही नाही तर मोगलाई आहे. महाविकास आघाडी सरकारमध्ये आरोप असलेल्या मंत्र्यांवर अद्यापही कारवाई करण्यात आलेली नाही. ज्या राज्यात आम्ही राहतो, त्या राज्यातील महिलांची अवस्था किती बिकट आणि वाईट आहे, याकडे ठाकरे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचेदेखील वाघ यांनी म्हटले.



(छाया : जितू शिगवण)

## काँग्रेसला कुणी गृहित धरू नये : महेंद्र घरत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात वेळोवेळी झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या मतांचा फायदा घेऊन काही लोक सत्तेत गेले. नंतर मात्र काँग्रेसला विसरले. आता तसे होऊ देणार नाही. आघाडी करण्यासाठी समविचारी पक्षांबरोबरच आता शिवसेनेचा पर्यायदेखील आमच्याकडे उपलब्ध आहे. आम्हाला कुणी गृहित धरू नये, असा इशारा काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांनी राष्ट्रवादीचे काँग्रेसचे नेते खासदार सुनील तटकरे यांना नाव न घेता दिला.

महेंद्र घरत मंगळवारी (दि. २१) अलिबाग येथे आले होते. या वेळी त्यांनी ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या, तसेच काँग्रेस भवन येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

जिल्हा परिषदेत सत्ता मिळवताना काँग्रेसचा पाठिंबा घेतला, पण काँग्रेसला एकही सभापतीपद दिले नाही. आमच्या मदतीने खासदार झाले, आमदार झाले, सत्ता मिळविली. नंतर मात्र काँग्रेसला विसरले. **(पान २ वर..)**

## निवडक

### करुणा शर्मा यांना अखेर जामीन मंजूर

**बीड :** राज्याचे सामाजिक न्यायमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा शर्मा यांना बीडमधील अंबेजोगाई सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. जातीवाचक शिवीगाळ आणि गाडीत पिस्तूल आढळल्याप्रकरणी शर्मा यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. अखेर त्यांची २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर कोर्टाकडून सुटका करण्यात आली आहे.

### ज्येष्ठ अभिनेते विद्याधर करमरकर यांचे निधन



**मुंबई :** मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ कलाकार विद्याधर करमरकर यांचे निधन झाले आहे. ते ९६ वर्षांचे होते. त्यांनी अनेक हिंदी, मराठी चित्रपटांत काम केले आहे. त्यासोबत अनेक जाहिरातींतही ते झळकले होते. आबा म्हणून त्यांना संपूर्ण सिनेसृष्टीत ओळखले जायचे. ‘उठा उठा दिवाळी आली, मोती स्नानाची वेळ झाली’ या जाहिरातीतील ‘अलार्म काका’ म्हणून ते प्रसिद्ध होते.

## माथेरान भाजपची नूतन कार्यकारिणी जाहीर



(छाया : संतोष पेरणे)

### प्रवीण सकपाळ अध्यक्षपदी

**कर्जत : बातमीदार**

माथेरान भाजपने नवीन कार्यकारिणी जाहीर केली आहे. माथेरानमधील क्षत्रिय मराठा समाजाचे माजी अध्यक्ष प्रवीण सकपाळ यांची भाजप शहर अध्यक्षपदी, तर किरण चौधरी, सुभाष भोसले यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

माथेरान शहरातील हॉटेल गार्डन व्ह्यू येथे झालेल्या सभेत भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, सरचिटणीस राजेश भगत, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष किरण ठाकरे यांच्या उपस्थितीत या नियुक्त्या करण्यात आल्या. यामध्ये तालुका खजिनदारपदी तत्कालीन शहराध्यक्ष विलास पाटील यांची, तर सरचिटणीसपदी राजेश चौधरी, चिटणीसपदी शैलेंद्र दळवी आणि संजय भोसले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शहर कार्यकारिणीत सदस्य म्हणून माजी नगरसेवक प्रदीप घावरे, कुलदीप जाधव, अरविंद शेलार, तसेच सचिन दाभेकर, दीपक शहा, भद्रेश शहा, अनिल गुप्ता, बाबू बर्गे, सुजय भोसले, माजी नगरसेविका संध्या शेलार, मनीषा पाटील यांचा समावेश करण्यात आला आहे.

### सोमय्या आक्रमक

## मुश्रीफांविरोधात ईडीकडे आणखी कागदपत्रे सुपूर्द

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे ग्रामविकास मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांचे पाय अजून खोलात जाण्याची शक्यता आहे. कारण भाजप नेते किरीट सोमय्या यांनी कागलमधील सरसेनापती साखर कारखान्याबाबत सक्तवसुली संचालनालयाकडे (ईडी) माहिती दिल्यानंतर मंगळवारी (दि. २१) त्यांनी आप्पासाहेब नलावडे गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याशी संबंधित कागदपत्रे सादर केली.

या दोन्ही कारखान्यांत हसन मुश्रीफ आणि परिवाराने बोगस कंपन्यांद्वारे पैसा वळवल्याचा आरोप सोमय्या यांनी केला आहे, तसेच एफआयआर जरी काही दिवस थांबला असला, तरी सोमय्या थांबणार नाही, असा इशाराही त्यांनी या वेळी दिला.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. २२ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर

पाच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

६. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
७. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
८. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
१०. तळोजा शाळा, तळोजा गाव
११. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
१२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१४. श्री. गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
१५. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१६. आगरी शाळा, खांदा कॉलनी
१७. सुधागड कॉलेज, कळंबोली
१८. न्यु इंग्लिश स्कूल, कळंबोली
१९. दत्तुशेठ पाटील हायस्कूल, कामोठे
२०. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

पनवेल ग्रामीण लसीकरण

१. तुर्भे, रा.जि.प. शाळा
२. रोहिंजण, रा.जि.प. शाळा
३. मुर्बी, रा.जि.प. शाळा
४. कोयनावेळे, रा.जि.प. शाळा
५. पाले खुर्द, रा.जि.प. शाळा
६. पेंधर, रा.जि.प. शाळा
७. तळोजे मजकूर, रा.जि.प. शाळा
८. कळंबोली, काळभैरव मंदिर सभागृह
९. आसुडगाव, रा.जि.प. शाळा
१०. जुई गाव, रा.जि.प. शाळा

निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता १५० व दुसऱ्या डोसकरिता ५० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी. (वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)


## पनवेल टाइम्स वर्तमानपत्राने सामाजिक बांधिलकी जपली -लोकनेते रामशेठ ठाकूर



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल टाइम्सने पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपली, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २१) येथे केले. ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्स वर्तमानपत्राच्या १३व्या वर्धापन दिन विशेषांकाचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते त्यांच्या निवासस्थानी करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या प्रकाशन सोहळ्यास ज्येष्ठ गझलकार अे. के. शेख, दै. वादळवाराचे संपादक विजय कडू, माजी शिक्षण सहसंचालक रोहिदास पोटे, ज्येष्ठ पत्रकार रमेश भोळे, संजय कदम, सा. शिवसम्राटचे संपादक रत्नाकर पाटील, पत्रकार राजेंद्र पाटील, चंद्रकांत शिर्के, विशाल सावंत, असीम शेख, छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## रायगडात पावसाची संततधार

**पनवेल, रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि. २१) दिवसभर पावसाची संततधार सुरू होती. त्यामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे.

गणपती विसर्जनानंतर तालुक्यात पावसाची उघडझाप सुरू होती, मात्र मंगळवारी सकाळी जोरदार हजेरी लावल्यानंतर सायंकाळपर्यंत पावसाची संततधार सुरू होती. त्याचा परिणाम बाजारपेठेत दिसून आला. पावसामुळे बाजारात ग्राहक दिसत नव्हते.

दरम्यान, जिल्ह्यात या वर्षी चांगला पाऊस पडल्याने भातशेती बहरली आहे. काही भागात लावणी लवकर झाली असल्याने भाताला दाणे येण्यास सुरुवात झाली आहे, तर काही ठिकाणी ही स्थिती प्राथमिक स्वरूपात आहे, मात्र पाऊस असाच कायम राहिल्यास त्याचा शेतीवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे.



(छाया : महादेव सरसंबे)

# गीतेंच्या वक्तव्यावर शिवसेनेने भूमिका स्पष्ट करावी –प्रवीण दरेकर

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेचे नेते अनंत गीते यांच्या वक्तव्यावर खासदार सुनील तटकरे यांनी केलेले भाष्य दुर्दैवी आहे. गीते यांचे वय काढणे व त्यांच्यासारख्या ज्येष्ठ शिवसेना नेत्यांबद्दल टीकाटिप्पणी करणे म्हणजे तटकरे यांची वैचारिक दिवाळखोरी आहे. केवळ सत्तेच्या अहंकारातून ही भूमिका आली असावी. त्यामुळे शिवसेना तसेच शिवसेना नेतृत्वाने तटकरे यांनी केलेल्या भाष्यावर आपली भूमिका स्पष्ट करावी, असे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी मंगळवारी (दि. २१) म्हटले.

शिवसेनेचे माजी खासदार आणि ज्येष्ठ नेते अनंत गीते यांनी राष्ट्रवादीबरोबर शिवसेनेची युती ही केवळ तडजोड आहे. राष्ट्रवादीचा जन्म काँग्रेसच्या पाठीत खंजीर खुपसून झाला आहे. शरद पवार आमचे गुरू होऊ शकत नाहीत, असे वक्तव्य केले. गीते यांच्या त्या वक्तव्यावर सुनील तटकरे यांनी गीते यांच्यावर जोरदार टीका केली. त्यासंदर्भात विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांची पत्रकार परिषद आयोजित केली होती. या वेळी भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये, तसेच भाजपच्या सचिव दिव्या ढोले उपस्थित होते.

दरेकर यांनी सांगितले की, महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यापासून राष्ट्रवादी शिवसेनेवर दबाव टाकून स्वतःचा विस्तार करत आहे. यामुळे शिवसेनेचे नुकसान होत असून या सगळ्या गोष्टीची घुसमट व त्या संदर्भातील संवेदना अनंत गीते यांच्या वक्तव्यातून आल्या



असाव्यात. शिवसैनिकांचे तालुकास्तरावर जे खच्चीकरण होत आहे, शिवसेनेचे आमदार काम करत असून त्यांना निधी देण्याबाबत जो दुजाभाव होतोय, कमिटीच्या नेमणुका असो, राज्यस्तरीय नेमणुका असो, शिवसेनेचा मुख्यमंत्री असतानाही शिवसेनचे आमदार, पदाधिकारी यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत. या सगळ्याचा परिपाक म्हणून ते यांनी हे वक्तव्य केले असावे असेही दरेकर यांनी स्पष्ट केले.

गीतेंच्या वक्तव्यानंतर तटकरे यांनी तातडीने पत्रकार परिषद घेतली. त्यामुळे सत्तेत एकत्र असूनही दोन्ही पक्षांमध्ये काय चालले आहे हे सांगण्यासाठी कोणा ज्योतिषाची गरज नाही. सरकारमध्ये विसंवाद असल्यामुळे असे प्रकार होत असतात. तटकरे यांनी गीते यांच्यासारख्या शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांवर केलेली टीका योग्य नाही. ज्या नेत्याने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याबरोबर पक्षाच्या उभारणीत हातभार लावला. कोकणातील कुणबी समाज गीते यांच्या माध्यमातून शिवसेनेच्या झेंड्याखाली एकवटला. गेल्या अनेक वर्षात गीते यांच्या विरोधात कुठलाही निषेध कधी झाला नाही वा भ्रष्टाचाराचे आरोपही झाले नाहीत.

गीते म्हणजे सूर्याच्या प्रकाशात तयार झालेले नेतृत्व आहे. आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखा तेजस्वी सूर्य या महाराष्ट्राच्या राजकारणात दुसरा झालेला नाही, असेही दरेकर यांनी सांगितले. महाविकास आघाडीत सर्व ठीक आहे हे तटकरे यांचे सांगणे हास्यास्पद आहे. गीते यांच्या वयाबद्दलही टीकाटिप्पणी केली गेली, पण तटकरे काही चिरतरुण नाहीत. कोणाच्या वयावरून टीकाटिप्पणी करणे योग्य नाही. काँग्रेस–राष्ट्रवादी पक्षात वय किती झाली तरीही त्यांच्या नेत्यांची सत्तेची हाव जात नसल्याचा टोलाही दरेकर यांनी शेवटी लगावला.

## पनवेल महापालिका क्षेत्रात राष्ट्रीय जंतनाशक सप्ताह

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार (दि. २१)पासून राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यास सुरुवात झाली. २१ ते २८ सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेचे सहा प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांवर स्थानिक नगरसेवकांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या मोहिमेंतर्गत १ ते १९ वर्ष वयोगटातील मुलामुलींना वयोगटानुसार जंतनाशक गोळीचे वाटप करण्यात येत आहे. अंगणवाडी शिक्षिका, आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर्स यांच्या माध्यमातून या गोळ्यांचे वाटप होत आहे.

अनेकदा बालकांमध्ये कृमीदोष आढळून यतो. या कृमीदोषामुळे मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटते. ही बाब लक्षात घेऊन या आजाराला



प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविली जाते. बालकांमधील जंताचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जंतनाशक गोळी देणे महत्त्वाचे असते. यासाठी पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत १९ वर्षापर्यंतच्या बालकांना चावून खावयाच्या जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येत आहे.

या वेळी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती सुशीला घरत, नगरसेविका चारुशीला घरत, भाजप पनवेल शहर महिला अध्यक्ष वर्षा नाईक, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, तसेच राकेश भुजबळ, मनोहर मुंबईकर आदी उपस्थित होते.

मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. आयुक्त गणेश देशमुख यांनी ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी पालिकेला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## नगरसेविका चारुशीला घरत यांच्या हस्ते नवीन पनवेलमध्ये लसीकरण केंद्राचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर तथा विद्यमान नगरसेविका चारुशीला घरत यांच्या प्रयत्नाने नवीन पनवेल येथील सेक्टर १५ पोदी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळा क्रमांक ८ येथे मोफत कोविड लसीकरण केंद्र मंगळवारी (दि. २१) सुरू करण्यात आले. या लसीकरण केंद्राचे उद्घाटन नगरसेविका चारुशीला घरत यांच्या हस्ते झाले असून या केंद्रावर कोविशिल्ड या लसीचे नागरिकांना डोस देण्यात येणार आहेत.



उद्घाटनाच्या वेळी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती सुशीला घरत, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, भाजप पनवेल शहर महिला अध्यक्ष वर्षा नाईक, कमलाकर घरत, जयराम मुंबईकर, वैद्यकीय सेल अध्यक्ष ज्योती देशमाने, सुहासिनी केकाणे, शिवानी रावते, लक्ष्मी चव्हाण, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळेच्या मुख्याध्यापिका अनुपमा डामरे, डॉ. महाजन व त्यांची टीम, लांगी, समीर मोरे, संतोष साळवे, दिनेश सुर्वे आदी उपस्थित होते.

## कर्जतमध्ये लसीकरण शिबिराला प्रतिसाद

**कर्जत : बातमीदार**

नेरळ ग्रामपंचायत सदस्य मंगेश म्हसकर यांच्या माध्यमातून आणि नेरळ पायरमाळ येथील माघी गणेशोत्सव मंडळ, बाळ गोपाळ नवरात्र उत्सव मंडळ आणि चॅलेंज क्रिकेट संघ यांच्या विद्यमाने कोविड लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात एका दिवसात कोविशिल्डच्या लसीचे पहिल्या आणि दुसऱ्या डोसचे लसी ४९० नागरिकांना देण्यात आल्या.

मंगेश म्हसकर यांच्या जनसंपर्क कार्यालयात कोविड लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचारी वर्गाने लसीकरण करून घेतले. डॉ. सागर काटे हे लसीकरण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तेथे उपस्थित होते. या शिबिरसाठी कोविशिल्ड लसींचा पहिला आणि दुसरा डोस यांचे ३०० डोस उपलब्ध होते, मात्र लसीकरण करून घेण्यासाठी झालेली गर्दी लक्षात घेऊन लसीकरण करून घेण्यासाठी जास्त लोक आल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असलेले डोस मागवून घेण्यात



आले. शेवटी दिवस अखेर तब्बल ४९० डोस देण्यात आले.

या वेळी नेरळ ग्रामपंचायतच्या सरपंच उषा पारधी, भाजप तालुका सरचिटणीस राजेश भगत, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस मृणाल खेडकर, शहर अध्यक्ष नम्रता कांदळगावकर, नेरळ शहर माजी अध्यक्ष अनिल जैन, मिलिंद साने यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य श्रद्धा कराळे, शिवानी रासम आदी उपस्थित होते.

## ट्रेलरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**उरण :** तालुक्यातील खोपटा–नवघर रस्त्यावर खोपटा पुलाजवळ भरधाव जाणाऱ्या ट्रेलरने धडक दिली. मंगळवारी (दि. २१) सकाळी झालेल्या या अपघातात मोटारसायकलस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाला. सीबर्ड या खाजगी प्रकल्पात कामाला असलेला संदीप पाटील (रा. वणेशी) मोटारसायकलवरून द्रोणागिरी नोड परिसरातील जात होता. या वेळी खोपटा पुलाजवळ भरधाव वेगात येणाऱ्या मालवाहू अवजड ट्रेलरने त्याला धडक दिली. या अपघाताता त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच उरण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या वेळी परिसरातील नागरिकांनी, कामगारांनी वेगात जाणाऱ्या ट्रेलरवर निर्बंध घालण्यात यावेत तसेच मृत संदीप पाटील यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, अशी मागणी केली.

## दिवाळीपासून नवी मुंबईतून जलप्रवासी वाहतूक

### आमदार मंदा म्हात्रे यांची माहिती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतून दिवाळीमध्ये समुद्रमार्गे प्रवासी वाहतूक सुरू होणार आहे. आधुनिक जेट्टीसह फिश मार्केट प्रकल्पाची सुरुवात नवी मुंबईत होत असून भविष्यात समुद्र संपत्तीतून रोजगार निर्माण होणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी वाशी येथील पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, पत्तन विभागामार्फत घणसोली, दिवा ऐरोली येथे जेट्टीचे काम केले आहे. या ठिकाणी वन विभागामार्फत फ्लेमिंगो पार्क



उपक्रम राबविल्यास तेथे पर्यटनास चालना मिळेल. याकरिता घणसोली, ऐरोली, दिवा येथे प्रवासी जेट्टी उभारण्याचे काम हाती घेतले आहे.

विकसित केल्यामुळे येथे फ्लेमिंगो पाहण्यासाठी पर्यटकांची नेहमीच गर्दी असते. या जेट्टीची लांबी व रुंदी वाढविल्यास भरती व ओहोटी या दिवशी बेलेस मोठ्या प्रमाणात फ्लोमिंगो सफारी होऊ शकते, तसेच जलवाहतुकीचे केंद्र सरकारच्या माध्यमातून नेरुळ येथे ११० कोटीचा सागरमाला जेट्टी प्रकल्प पूर्णत्वास आला असून येत्या दिवाळीमध्ये येथून पूर्ण क्षमतेने प्रवासी वाहतूक सुरू होईल. बेलापूर येथून प्रवासी जेट्टी सुरू होणार असून तिथे तिकीट घर आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

वाशी गाव येथील जेट्टीची लांबी व रुंद वाढवण्यासंदर्भात प्रयत्न सुरू आहेत. दिवाळे येथील जेट्टी आणि संलग्न असणारे फिश मार्केट प्रकल्प पूर्ण झाला असून मासेमारी व्यवसायास चालना मिळणार आहे. पत्रकार परिषदेला भाजप नवी मुंबई महामंत्री निलेश म्हात्रे, डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, माजी नगरसेवक दीपक पवार, दिवा कोळीवाडा मच्छीमार सेवा संस्थेचे अध्यक्ष चंदन मढवी, अजित मढवी आदी उपस्थित होते.

## गृहनिर्माण योजनेमध्ये सिडकोकडून अर्जदारांना दिलासा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी गृहनिर्माण योजनेतील अर्जदारांना अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता आवश्यकतेनुसार सिडकोच्या एम्पॅनल्ड बँकांकडून कर्ज मिळू शकणार आहे. हा निर्णय गृहनिर्माण योजनेकरिता अर्ज करणाऱ्या कोविड योद्ध्यांसाठी निश्चितच फायदेशीर ठरणार आहे.

**अर्जदारांना अनामत रकमेची जमवाजमव सुलभतेने करता यावी यासाठी सिडकोने हे सकारात्मक पाऊल उचलले आहे. अर्जदारांनी आपल्या आवश्यकतेनुसार या सुविधेचा लाभ घ्यावा व आपल्या घराचे स्वप्न साकार करावे.**

**–डॉ. संजय मुखर्जी, एमडी, सिडको**

सिडकोकडून कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला असून या योजनेंतर्गत पाच नोडमध्ये एकूण ४,४८८ घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता दोन लाख रुपये आणि सर्वसाधारण प्रवर्गाकरिता २.५ लाख रुपये अनामत रक्कम लागू आहे. कागदपत्रे जमा करण्यासाठी व अनामत रक्कम भरण्याकरिता ९ सप्टेंबर २०२१ ही अंतिम तारीख असताना अर्जदारांनी केलेल्या विनंतीवरून यापूर्वीच ७ ऑक्टोबर २०२१पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

मुदतवाढीनंतर अनेक अर्जदारांच्या विनंतीनुसार सिडकोने आपल्या एम्पॅनल्ड बँकांशी संपर्क साधून अर्जदारांना अनामत रक्कम भरण्याकरिता आर्थिक सहाय्य करण्याबाबत व्यवस्था करण्यास सुचवले. यानंतर एम्पॅनल्ड बँकांनी संबंधित अर्जदारांना अनामत रकमेचा भरणा करण्याकरिता कर्ज देण्यास अनुकूलता दर्शविली. यानुसार एम्पॅनल्ड बँकांची यादी योजनेच्या https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

अर्जदार व बँका यामध्ये या संदर्भात करण्यात येणाऱ्या व्यवहारात सिडकोची कोणतीही भूमिका नसून अर्जदारांनी आपल्या जबाबदारीवर सदर बँकांशी व्यवहार करावा, असे सिडकोने कळविले आहे.

## दुखवटा

### वसंत चौलकर



**पनवेल :** गुळसुंदे येथील ज्येष्ठ नागरिक, क्रिकेटप्रेमी वसंत दशरथ चौलकर (वय ७३) यांचे सोमवारी (दि. २०) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी नंदा, मुलगा संतोष, स्वप्नील, संकेत, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. कै. वसंत चौलकर यांच्या पार्थिवावर गुळसुंदे येथील स्मशानभूमीत कोरोनाचे नियम पाळून अंत्यसंस्कार करण्यात आले. वसंत चौलकर यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि. २९) गुळसुंदे श्रीक्षेत्र येथे, तर उत्तरकार्य शनिवारी (दि. २ ऑक्टोबर) होणार आहे.

### रघुनाथ माळी

**पनवेल :** भाजपचे केळवणे जि. प. विभागीय माजी अध्यक्ष तथा माजी सरपंच किरण माळी यांचे वडील माजी सैनिक रघुनाथ नामदेव माळी (वय ८२) यांचे कासप या मूळ गावी रविवारी (दि. १९) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि. २८) पाताळगंगा शिवमंदिर येथे तर उत्तरकार्य शुक्रवारी (दि. १ ऑक्टोबर) कासप येथे होणार आहे.



### अनुराधा म्हात्रे



**उरण :** तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अविनाश म्हात्रे व ज्येष्ठ पत्रकार सूर्यकांत म्हात्रे यांच्या मातोश्री निवृत्त मुख्याध्यापिका अनुराधा राजाराम म्हात्रे (वय ८१) यांचे सोमवारी (दि. २०) निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुलगे, सुना आणि नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे. कै. त्यांचा अनुराधा म्हात्रे यांचा दशक्रिया विधी श्री क्षेत्र चिरनेर खाडी येथे बुधवारी (दि. २९) होणार असून उत्तरकार्य चिरनेर येथे शुक्रवारी (दि. १ ऑक्टोबर) होणार आहे.

## 'शिवसेनेकडून बेस्टला खड्ड्यात घालण्याचे काम'

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेकडून बेस्टला ३५ कोटींच्या खड्ड्यात घालणारी निविदा केवळ मर्जीतील कंपनीला कंत्राट देण्यासाठी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात न्यायालयात जाऊ, असा इशारा भाजपचे गटनेते प्रभाकर शिंदे यांनी दिला.

शिंदे म्हणाले की, आज बेस्ट डिजिटल तिकीट निविदेचा प्रस्ताव समितीच्या सभेमध्ये चर्चेला आला असता भाजपच्या नगरसेवकांनी बोलण्याची मागणी केली, मात्र ती फेटाळून कुठलीही चर्चा करू न देता, कुणालाही बोलू न देता, कुठल्याही मतदानाविना बेस्ट समिती अध्यक्षांनी प्रस्ताव अनुकूल, प्रतिकूल मंजूर असे घोषित केले. मर्जीतील कंत्राटदार, नातेवाईक, बगलबच्च्यांना कामे देणाऱ्या शिवसेनेने पुन्हा एकदा बेस्टला खड्ड्यात घालण्याचे काम केले असून त्या विरोधात बोलणाऱ्या विरोधकांचा आवाज दाबला आहे.

या प्रस्तावासाठी २० संस्थांनी स्वारस्य दाखवले होते. २० इच्छुक निविदाकारांपैकी फक्त तीन निविदाकारांनी निविदेत भाग घेतला. एका नामांकित आंतरराष्ट्रीय संस्थेला पूर्वपात्रता निकष फेरीतच किरकोळ त्रुटी दाखवून चतुराईने बाहेर केले. मे. झोपहॉप कंपनी सन २०१८–१९करिता ८.२२ कोटी रुपये आर्थिक उलाढाल असल्याने वार्षिक आर्थिक उलाढालीची अट पूर्ण करीत नव्हती तरीही बेस्ट अधिकाऱ्यांनी त्यांना निविदेतून बाद केले नाही. बेस्ट संस्थेस निविदेतून प्राप्त झालेला १४ पैसे दर हा फारच जास्त असून अनेक संस्था ७ पैसे दराने प्रस्तावित प्रकल्पाची त्यांच्या प्रसारित दराप्रमाणे अंमलबजावणी करण्यास तयार आहेत ज्यामुळे बेस्ट उपक्रमाचे ३५ कोटी वाचतील, असे बेस्टचे महाव्यवस्थापक यांना कळविण्यात आले होते. असे असतानाही सत्ताधारी पक्षाने केवळ मर्जीतील कंपनीला कंत्राट देण्यासाठी चर्चा न करताच हा प्रस्ताव मंजूर केला.

पान १ वरून

## अनंत गीतेंच्या वक्तव्याचे पडसाद

महाविकास आघाडी ही सत्तेची तडतोड आहे. काँग्रेससुद्धा काँग्रेस आहे, राष्ट्रवादीसुद्धा काँग्रेस आहे. तरी एकमेकांचे तोंड बघत होते का, एकमेकांचे कधी जमत होते का, यांचा विचार एक आहे का? दोन काँग्रेस एक विचारांची होऊ शकत नाही, तर शिवसेना ही काँग्रेस विचारांची कदापि होऊ शकणार नाही, असे गीते म्हणाले होते.

एवढेच नव्हे तर राष्ट्रवादीचा जन्म काँग्रेसच्या पाठीत खंजीर खुपसून झाला आहे. दुसरा कुठलाही नेता, त्याला जगाने कितीही उपाध्या देवोत, त्याला कोणी जाणता राजा म्हणो, पण आमचा गुरू तो होऊ शकत नाही, आमचे गुरू फक्त बाळासाहेब ठाकरे, अशा शब्दांत गीतेंनी शरद पवार यांचे नाव न घेता राष्ट्रवादीला डिवचले. त्यांच्या या विधानांचे जोरदार पडसाद उमटले आहेत.

## काँग्रेसला कुणी गृहित धरू नये : महेंद्र घरत

याचे शल्य काँग्रेस कार्यकर्त्यांना आहे. त्यामुळे यापुढे जो काँग्रेसला फसवेल त्याच्याशी जशास तसे वागणार. कुणी सांगितले म्हणून आघाडी करणार नाही. आता आमच्याकडे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. आम्ही शिवसेनेशीदेखील युती करू शकतो. आम्हाला कुणी गृहित धरू नये, असे महेंद्र घरत म्हणाले.

काँग्रेसचे माजी जिल्हा अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील, अलिबाग तालुका अध्यक्ष योगेश मगर, जिल्हा उपाध्यक्ष अनंत गोंधळी, महिला काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष ॲड. श्रद्धा ठाकूर, प्रदेश सरचिटणीस नंदा म्हात्रे, हर्षल पाटील, कृष्णा भोपी, कविता ठाकूर, ताई गडकर, मिलिंद पाडगावकर, मार्तंड नाखवा, उल्हास वाटकरे, हेमराज म्हात्रे, सुदाम पाटील, प्रभाकर राणे आदी या सभेला उपस्थित होते.

## पनवेल टाइम्स वर्तमानपत्राने सामाजिक बांधिलकी जपली –लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना गणेश कोळी गेल्या ३० वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रियतेने कार्यरत आहेत. सर्वसमावेशक बातम्यांच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारितेला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. आधुनिकीकरणाच्या युगात सोशल मीडियामुळे तात्काळ प्रसिद्धी होत असते, मात्र गणेश कोळी यांच्यासारख्या पत्रकारांमुळे वर्तमानपत्रांचे महत्त्व अबाधित आहे, असे सांगतानाच कोळी यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल कौतुक केले आणि तसेच पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

गणेश कोळी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, पनवेल, नवी मुंबईतून प्रकाशित होणारे आमचे वृत्तपत्र आहे. विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याचे प्रामाणिक प्रयत्न करीत आलो आहे. यापुढेही पत्रकारिता आत्मा मानून काम करणार आहे.

या वर्धापन दिन विशेषांकात पत्रकारितेचा प्रवास, पनवेल टाइम्सची घोडदौड, सत्य बातम्यांचा मागोवा, सर्वस्पर्शी पत्रकारिता, डिजिटल पत्रकारिता आदी विषयांवरील लेखांचा समावेश आहे.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील प्रकरण ५ मधील कलम २७ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील नियम १५ (१) मध्ये बाल कल्याण समितीची स्थापना करण्याची तरतूद आहे, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ चा नियम ९१च्या अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या शिफारशीनुसार बाल कल्याण समितीची स्थापना करण्यात येते.

त्यानुसार अध्यक्ष/सदस्य, बाल कल्याण समिती या पदांसाठी विहीत पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या अशासकीय सदस्यांची नियुक्तीकरिता पात्र उमेदवारांचे अर्ज जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत मागविण्यात येत आहेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

सदर जाहिरातबाबतची जिल्हानिहाय नियुक्त करावयाची पदे याबाबतची माहिती, पात्रता, अटी व शर्ती याबाबतच्या अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळाच्या मुख्य पृष्ठावरील नवीनतम संदेश या ठिकाणी भेट द्यावी.

**सही/–**
**(राहुल मोरे)**
**आयुक्त,**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

# कोरोना प्रतिबंधक नियमांचे नवी मुंबईत उल्लंघन

# तीन बारवर दंडात्मक कारवाई

## दीड लाखांचा दंड वसूल



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोरोना नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात महानगरपालिकेने मोहीम सुरू केली आहे. रात्री १० नंतरही व्यवसाय सुरू ठेवणाऱ्या तीन बारवर कारवाई केली असून त्यांच्यावर प्रत्येकी ५० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. गणेशोत्सव काळात ४०४ जणांवर कारवाई केली असून दोन लाख ७२ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

नवी मुंबईमध्ये हॉटेल आणि रेस्टॉरंट रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे, परंतु अनेक हॉटेलचालक रात्री उशिरापर्यंत व्यवसाय करत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. यामुळे महानगरपालिकेच्या दक्षता पथकानेही कारवाई सुरू केली आहे. सेक्टर १९मधील रेस्टॉरंट बारमध्ये रात्री ११नंतरही ग्राहक असल्याचे निदर्शनास आले. कोपरखैरणे सेक्टर ९मधील बार आणि बेलापूर सेक्टर ११मधील हॉटेलवर छापा टाकला असता उशिरापर्यंत हॉटेल सुरू असल्याचे निदर्शनास आले.

कोरोनाची संभाव्य तिसरी लाट रोखण्यासाठी सर्व नागरिकांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. नियमांचे काटेकोरपणे पालन झाले नाही, तर रुग्णसंख्या पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. यामुळे नियमांचे उल्लंघन करताना कोणी आढळले, तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

हॉटेलचालकांनी पहिल्यांदा नियम मोडल्यास ५० हजार रुपये दंड, दुसऱ्यांदा नियम मोडल्यास सात दिवसांकरिता आस्थापन बंद ठेवण्यात येणार असून तिसऱ्या वेळी नियम मोडल्यास कोरोना महामारी संपेपर्यंत हॉटेल बंद करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

महानगरपालिका प्रशासनाने १० ऑगस्ट २०२०पासून कोरोना नियमांचे उल्लंघन करणारांवर कारवाई करण्यासाठी दक्षता पथक तयार केले आहे. या पथकाने वर्षभरात तब्बल ७४२८६ जणांवर कारवाई केली आहे. त्यांच्याकडून तीन कोटी ९१ लाख सात हजार १०० रुपये दंड वसूल केला आहे.

## पनवेलमध्ये हॉटेलवर कारवाई

**पनवेल :** तालुक्यातील डेरवली गावाच्या हद्दीत असलेल्या निसर्ग गार्डन हॉटेलवर पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. या ठिकाणी ग्राहक टेबलावर बसून गर्दी करून खाद्यपदार्थ सेवन करीत होते, तसेच त्यांना सर्व्हिस देणारे वेटर मास्क न लावता आणि सामाजिक अंतर न पाळता आढळून आले. त्यामुळे कोरोनाचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता असल्याची जाणीव असतानादेखील हयगयीचे व निष्काळजीपणाचे कृत्य केले म्हणून हॉटेल कॅशिअर सुखरान गिरी (वय ३४) व मॅनेजर युवराज शेळके (वय २६) यांच्याविरुद्ध कलम १८८, २६९, भा.दं.वि. साथ रोग प्रतिबंध अधिनियम कलम २, ३ सह महाराष्ट्र शासन कोविड-१९ २०२०चे कलम ११ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

## निवडक




### ‘रोटरी’तर्फे निर्माल्याचे संकलन

**मोहोपाडा :** रोटरी व रोटरॅक्ट क्लब ऑफ पाताळगंगा यांच्या वतीने गणेश उत्सवात दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस आणि अनंत चतुर्दशीपर्यंत असणाऱ्या रसायनी परिसरातील काही गणेश बाप्पांचे विसर्जन रिस येथील गणेश विसर्जन घाटावर करण्यात आले. विसर्जनस्थळी आलेल्या भाविकांकडून गणेश घाट परिसर अस्वच्छ होत असतो. यासाठी रोटरी व रोटरॅक्ट क्लब ऑफ पाताळगंगा यांनी निर्माल्य कुंड केला. या कुंडात निर्माल्य टाकावे यासाठी रोटरी व रोटरॅक्ट ऑफ पाताळगंगा यांच्या स्वयंसेवकांनी आजूबाजूच्या परिसरात पडलेला प्लास्टिक कचरा संकलित करून त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावली. या वेळी रोटरी क्लब पाताळगंगाचे अध्यक्ष गणेश काळे, माजी अध्यक्ष भोसले, होनावळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक एन. डी. गुंड, परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी, रोटरीचे स्वयंसेवक, गणेशभक्त या कार्यक्रमास उपस्थित होते.



### गरजूंना किराणा सामानाचे वाटप

**मोहोपाडा :** संत डॉ. गुरुमित राम रहीम यांच्या भक्तांकडून चौक कलोते मोकाशी येथील शाह संत नामजी परमसुख आश्रम येथे १५ गरजू व गरीब आदिवासी कुटुंबांना एक महिन्याचे जीवनावश्यक किराणा सामानाचे वाटप करण्यात आले. संत गुरुमीत डॉ. राम रहीम सच्चा सौदाच्या ४५ गुरुदयाल इंसा यांनी आपल्या स्वखर्चाने हे सामान गोरगरीब परिवारांना वाटप केले. या वेळी पंजाब हरियाणा येथून आलेले भक्त जगरूप इंसा, हरचरण इंसा, ब्रह्मचारी बंता इंसा, कृष्णकुमार कुंडू सतविर इंसा, जनार्दन इंसा, सतपाल इंसा, राकेश इंसा, पुरणमल सुरजीत इंसा व महिला भक्त अनु, सुनिता, मोनिका, शालिनी, कामिनी इंसा आदी भक्तगणासह गोरगरीब आदिवासी बांधव उपस्थित होते.

## खारघरमधील उघडे नाले बंदिस्त करा

### नगरसेविका नेत्रा पाटील यांची सिडकोकडे मागणी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर शहराच्या मध्यभागातून वाहणारे उघडे नाले बंदिस्त करण्याबाबतची मागणी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी सिडकोच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देऊन केली आहे.

नगरसेविका पाटील यांनी सिडकोच्या अधिकारी वर्गाच्या निदर्शनास आणून दिले की, त्यांच्या प्रभागातील सेक्टर २० व २१ मधील जलवायु-विहार समोरील नाला उघडा असल्याकारणाने या नाल्यात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचते. त्याचबरोबर बरीच घाण, कचरादेखील मोठ्या प्रमाणात या नाल्यात ठिकठिकाणी झालेला आहे. हा नाला उघडा असल्याकारणाने व तोच नाला पुढे शिल्प चौकातून ग्रीन फिंगर ग्लोबल स्कूलच्या समोरून पुढे जातो. त्यामुळे आजबाजूच्या सोसायटीतील रहिवाशांना, तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना दुर्गंधीयुक्त श्वास घ्यावा लागतो. पावसाळा सुरू असल्याकारणाने नाल्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले आहे व गवतदेखील वाढलेले आहे. त्यामुळे डासांचे प्रमाण वाढलेले असून परिसरात मलेरिया, डेंगू, थंडी-ताप इत्यादी आजारांचे रुग्ण वाढत आहेत. या नाल्याची त्वरित साफ-सफाई करून साथीच्या आजारांपासून रहिवाशांची मुक्तता करावी. नाला बंदिस्त करावा यासाठी परिसरातील नागरिकांनी माझ्याकडे मागणी केली आहे. त्यांना वर्षानुवर्षे या उघड्या नाल्याचा त्रास होत आहे.

दरवर्षी या ठिकाणी साचणाऱ्या पाण्यामुळे नागरिक आजारी पडतात. नाले बंदिस्ती केल्याने नागरिकांना होणारा त्रास बंद होईल. आपण रहिवाशांची मागणी लक्षात घेता हा नाला बंदिस्त करावा.

## फसवणूकप्रकरणी व्यावसायिकावर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

चिंचवली येथे सदनिका न देता दोन लाख १३ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. बांधकाम व्यावसायिक यशवंत झेंडे यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठाणे यशस्वीनगर येथील रोहन विनोद शिंदे हे पनवेल परिसरात नवीन घर विकत घेण्यासाठी शोधत होते. या वेळी सुमेध इंटरप्राईजेसचे संकल्प बिल्डर अॅण्ड डेव्हलपर्सच्या होर्डिंगवरील नंबरवर संपर्क केला. त्यानंतर त्यांना चिंचवली येथील प्लॉटवर नियोजित प्रकल्प चालू करणार असल्याचे झेंडेंनी सांगितले. या वेळी २७५ चौरस फुटाच्या सदनिकेसाठी शिंदेंनी दोन लाख ५३ हजार ५०० रुपये चेकद्वारे दिले. त्यानंतर सदनिकेच्या बांधकामाबाबत विचारणा केली असता काम चालू असल्याचे सांगण्यात आले.

शिंदे यांनी बिल्डरच्या कार्यालयात जाऊन चौकशी केली असता रोहन यांच्या वडिलांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यामुळे यशवंत झेंडे यांना फोन करून भरलेली रक्कम परत देण्यासाठी सांगितले. या वेळी यशवंत झेंडे यांनी ४० हजार रुपये परत दिले आणि सदनिका न देता दोन लाख १३ हजार ५०० रुपयांची फसवणूक करण्यात आली.



## आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने मोरा येथे मोफत कोविड लसीकरण केंद्र

**उरण : वार्ताहर**

कोरोनापासून नागरिकांचा बचाव व्हावा, तसेच त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना त्रास होऊ नये. नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे. खाजगी हॉस्पिटल लसीकरणासाठी नागरिकांना पैसे मोजावे लागतात. गरीब-गरजू नागरिकांना लसीकरण मोफत मिळावे या उद्देशाने आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांतून उरण तालुक्यातील मोरा इंग्लिश मीडियम स्कूल येथे मोफत कोरोना लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे. सोमवारी (दि. २०) या लसीकरण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, हितेश शाह, माजी नगरसेविका नंदा माजगावकर, माजी नगरसेवक राजेश कोळी, विनायक कोळी, रोहित कोळी, अप्पू कोळी आदी उपस्थित होते.

या केंद्रावर कोरोना लसीकरण दर सोमवार व गुरुवार सकाळी ९ वाजल्यापासून देण्यात येईल, असे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

## पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयाला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरची भेट

### पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील तीर्थरूप डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त डाव केमिकल इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीच्या वतीने दोन ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देण्यात आले.

या वेळी डाव कंपनीचे योगेश कुडतरकर, डॉ. प्रज्ञा, अविनाश पाटील, हॉस्पिटलच्या वतीने डॉ. सचिन सकपाळ, डॉ. कालेल, डॉ. संजय गुडे, अधिसेविका ज्योती गुरव, प्रशासकीय अधिकारी सुभाष जाधव, ज्येष्ठ नगरसेवक अनिल भगत, जय भारतीय जनरल कामगार संघटना अध्यक्ष जितेंद्र घरत आदी उपस्थित होते.



## मुलाचे डोके आपटून बापाने घेतला जीव

### नवी मुंबईतील धक्कादायक घटना; आरोपी अटकेत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पत्नीशी झालेल्या वादातून एका बापाने आपल्याच चार वर्षीय मुलाची डोके आपटून हत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. नवी मुंबईतील सानपाड्यात ही घटना घडली आहे. दुसऱ्या पत्नीशी झालेल्या वादातून सानपाडा रेल्वेस्टेशनवरील फलाट क्रमांक ३वर या निर्दयी बापाने स्वतःच्या चार वर्षीय मुलाचे तीन वेळेस डोके आपटून त्याची हत्या केली. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. मुलाची हत्या करणाऱ्या बापाला वाशी जीआरपी यांनी अटक केली आहे.

सानपाडा रेल्वेस्टेशनवर फलाट क्रमांक ३ आणि ४ दरम्यान हा प्रकार घडला आहे. आरोपी बाप भटक्या कुटुंबातील आहे. आरोपी बाप आणि त्याच्या पत्नीचे नेहमी वाद होत होते. हे दोघे भांडण करत असताना रेल्वेस्थानकावर पोहचले. या वेळी फलाटावर एकत्र चालत असताना आरोपीचा पत्नीसोबत वाद सुरू होता. या वादातून त्याने स्वतःच्या चार वर्षांचा मुलाला उचलून फलाटावर आपटले.




या वेळी काही व्यक्तींनी त्याला अडविण्याचाही प्रयत्न केला, परंतु तो सतत मुलाला उचलून जोराने खाली फेकत होता. हा बाप आपल्या मुलाला अत्यंत निर्दयीपणे उचलून खाली फेकत होता. अखेर हा क्रूर प्रकार पाहून एका प्रवासी महिलेनेही त्याला अडवून मुलाला वाचविण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यानंतरही आरोपी बाप हा चिमुकल्याला उचलून आपटत राहिल्याने जखमी होऊन त्यातच त्याचा मृत्यू झाला.

या घटनेप्रकरणी वाशी रेल्वे पोलिसांनी आरोपी बापाविरोधात गुन्हा दाखल करून अटक केली आहे. मृत हा आरोपी बापाच्या पहिल्या पत्नीपासूनचा मुलगा होता. त्याची पहिली पत्नी गावी असून, तो सध्या दुसऱ्या पत्नीसोबत नवी मुंबईत सानपाड्याला राहत होता. रविवारी रात्रीपासून आरोपीचा दुसऱ्या पत्नीसोबत वाद सुरू होता. सोमवारी सकाळी सर्वजण सानपाडा स्थानकात आले असता त्या ठिकाणीही त्यांचा वाद सुरू होता. याच रागातून आरोपी बापाने मुलाला उचलून आपटून त्याची हत्या केली. याप्रकरणी त्याला अटक करण्यात आल्याची माहिती वाशी रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू केसरकर यांनी दिली आहे.

## मुंबई एपीएम टर्मिनल्सतर्फे हनुमान कोळीवाडा येथे लसीकरण मोहीम



**उरण : वार्ताहर**

एपीएम टर्मिनल्स मुंबई (जीटीआय), एपीएम टर्मिनल्स ग्लोबल टर्मिनल नेटवर्कचा एक भाग या नात्याने वाशी एमजीएम हॉस्पिटलच्या सहाकार्याने उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा येथे मोफत कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहीम शिबिर आयोजित केले होते.

पहिले शिबिर गुरुवारी (दि. ९) आयोजित करण्यात आले. त्या वेळी ३७० डोस नागरिकांना देण्यात आले आणि दुसरे शिबिर शुक्रवारी (दि. १७) घेण्यात आले. त्या वेळेस १३० डोस नागरिकांना देण्यात आले. एकूण ५०० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. परिसरातील नागरिकांचा कोरोना विषाणूपासून बचाव व्हावा या उद्देशाने या लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. टर्मिनल कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) प्रयत्नांतर्गत शिबिरे घेण्यात आली.

या वेळी लसीकरण मोहिमेला तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, एपीएम टर्मिनल्स मुंबईकडून सुनील शर्मा, दर्शन सागदेव, केव्हीन गाला, प्रवीण हराळे, मनोज पांडे आणि सीएसआर अधिकारी हाफिज शेख, एमजीएम हॉस्पिटलचे विपणन आणि प्रशासन प्रमुख अक्षय कुमार झा आणि हॉस्पिटल कर्मचारी उपस्थित होते.

## मास्टरमाईंड नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धेत स्वरांश कोळीचे यश



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मास्टरमाईंड नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये नवी मुंबईच्या स्वरांश कोळी याने तिसऱ्या क्रमांकाचे मानांकन मिळवून सलग तिसऱ्यांदा आपले स्थान कायम राखून विजयाची हॅट्रिक केली आहे.

स्वरांशने शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपल्या बुद्धीचा व कौशल्याचा ठसा उमटवून नवी मुंबईचा शैक्षणिक क्षेत्रामध्ये असलेला बहुमान कायम राखून ठेवला. स्वारांशच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलात आनंदाचे वातावरण पसरले आहे. स्वारांशने प्रथम शाळास्तरीय व त्यानंतर राज्यस्तरीय अशा दोन्ही परीक्षांमध्ये भरघोस यश मिळविले आहे.

मास्टरमाईंड नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी विविध राज्यातून हजारो विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये स्वरांशने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याला तीन गौरव चिन्ह, एक रौप्य पदक व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. या वेळी मास्टरमाईंड संस्थेचे संस्थापक बिपिन चेड्डा, भारती विद्यापीठ शैक्षणिक संस्थेचे डायरेक्टर डॉ. विलासराव कदम, प्राचार्य आलोक शर्मा, मुख्याध्यापिका रश्मी कुलकर्णी, पर्यवेक्षक जस्विंदर कौर, पूनम सिंग, फेल्सिया सालिन्स, शिकवणी शिक्षिका साबिया खान व संपूर्ण भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलाचे कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम कोरोना प्रतिबंधक नियम व अटी पाळून झाला.



**पनवेल : माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर यांच्या घरी गणेशोत्सवानिमित्त विसर्जनापूर्वी श्री सत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली होती. या बाप्पाचे व पूजेचे नगरसेविका दर्शना भोईर, तसेच सोनी कल्याणकर, स्नेहल कल्याणकर, सौ. झगडे, सौ. बहिरा, सौ. चंदने आदींनी दर्शन घेतले.**

## संपादकीय

# सरकारी पत्रसंवाद

राज्याचे घटनात्मक प्रमुख माननीय राज्यपाल हेच असतात. म्हणूनच विधिमंडळ अधिवेशनाच्या प्रारंभी राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये माझे सरकार असा उल्लेख वारंवार आढळून येतो. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारबद्दल तसे काही म्हणायची सोय राहिलेली नाही. कारण उलटेसुलटे राजकीय खेळ करून सत्ता काबीज करणाऱ्या महाविकास आघाडी सरकारचा राज्यपालांशी सुसंवादच नाही. गेल्या दोन वर्षांमध्ये या उभयतांमधील विसंवादाचे अनेक प्रसंग घडले आहेत. माननीय राज्यपालांचा मान ठेवण्याची जबाबदारी अंतिमतः राज्य सरकारवरच असते, परंतु हीच बाब सत्ताधारी विसरलेले दिसतात.

**महामहीम राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यामध्ये सुसंवाद असणे लोकशाही व्यवस्थेत अभिप्रेत असते, परंतु तसे घडतेच असे नाही. वास्तविक राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रिमंडळ माननीय राज्यपालांच्या वतीनेच कारभार करत असतात. त्यामुळेच माननीय राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र पाठवून अनेक बाबींबाबत चिंता व्यक्त केली. राज्याचा घटनात्मक प्रमुख म्हणून ते त्यांचे कामच आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईतील साकीनाका भागात एका असहाय महिलेवर निर्घृण बलात्कार व अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी कुणी मोहन चौहान नावाचा इसम गजाआड करण्यात आला आहे. अतिशय विकृत पद्धतीने या इसमाने केलेले घृणास्पद कृत्य साऱ्या देशातील सुजाण नागरिकांच्या मनावर ओरखडा उठवून गेले. याच संदर्भात राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्र पाठवून चिंता प्रकट केली. राज्यातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आल्याचे हे लक्षण असून यासंदर्भात चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे दोन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे, अशी सूचनादेखील राज्यपालांनी पत्राद्वारे केली. या पत्रामुळे महाविकास आघाडी सरकारमधील नेत्यांचे पित्त खवळणे स्वाभाविक होते. महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेचे जे काही भजे झाले आहे, ते सारी जनता पाहातेच आहे. त्यात लपवण्यासारखे काहीही नाही. साकीनाका येथील बलात्काराची घटना महाराष्ट्राची उरलीसुरली अब्रू धुळीला मिळवणारी ठरली. या बाबींचा उल्लेख राज्यपालांनी पत्रात केल्यामुळे सत्ताधाऱ्यांचा पोटशूळ उठला. मुख्यमंत्र्यांनी ताबडतोबीने राज्यपालांच्या पत्राला प्रत्युत्तर पाठवले. सरकारचा अहंगंड आणि बेजबाबदारपणा पत्रातील शब्दाशब्दातून ठिबकताना दिसतो. साकीनाका येथील घटनेबद्दल आम्हालाही काळजी आहे, परंतु विरोधकांच्या मागणीनुसार विशेष अधिवेशन बोलावण्याचा आग्रह धरल्यास वाद वाढू शकेल, तसेच सरकारच्या बदनामीस ते कारणीभूत ठरेल. अशा आशयाचे प्रत्युत्तर सरकारतर्फे राज्यपालांना धाडण्यात आले आहे. महिलांची सुरक्षा हा राष्ट्रव्यापी प्रश्न असून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यास आपण केंद्र सरकारला गळ घालावी, असा सल्लाही मुख्यमंत्र्यांनी आपल्या पत्रात दिला आहे. माननीय राज्यपाल हे महाराष्ट्राचे घटनात्मक प्रमुख आहेत, संपूर्ण भारताचे नव्हे हे सत्ताधाऱ्यांना कुणीतरी शिकवायला हवे. महिलांच्या सुरक्षेविषयी व साकीनाका बलात्कार हत्येप्रकरणी राज्य सरकार खंबीर पावले टाकत आहे असेही या पत्रात म्हटले आहे. ही खंबीर पावले नेमकी कोणती हे स्पष्ट करून सांगितले असते, तर अधिक बरे झाले असते! एकंदरीत राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील विसंवाद दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. महाराष्ट्रासाठी हे काही फारसे भूषणावह नाही. राज्यपालांना पाठवलेल्या पत्रामध्ये सरकारने योजलेल्या उपायांची माहिती मुख्यमंत्र्यांनी विस्तृतपणे दिली असती तरी चालले असते, परंतु पावलोपावली राजकारणाचे खेळ करणाऱ्या महाविकास आघाडीला ना लोकशाहीची पर्वा आहे, ना महाराष्ट्राच्या प्रतिमेची.**

# दहशतवादी वेशीवर असताना पनवेल स्टेशन असुरक्षित

गणेशोत्सवात दिल्ली पोलिसांनी अटक केलेल्या दहशतवाद्यांनी मुंबईची रेल्वे दहशतवाद्यांच्या हीटलिस्टवर असल्याची माहिती दिल्यानंतर मुंबईतील मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या महत्त्वाच्या स्टेशनवर पोलिसांनी बंदोबस्त वाढवला. यामध्ये पनवेल स्टेशनचाही समावेश आहे, पण मुंबईचे प्रवेशद्वार समजले जाणाऱ्या पनवेल रेल्वेस्टेशनवर प्रवाशांच्या सुरक्षेच्या बाबतीत अत्यंत बेफिकिरी दिसून येत आहे. येथील संशयित प्रवाशांच्या सामानाची तपासणी करण्यासाठी असलेले स्कॅनिंग मशीन पाच वर्षांपासून भंगारात गेले आहे. मागणी करूनही नवीन मशीन देण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे रेल्वेचे अधिकारी एखादी मोठी दुर्घटना घडण्याची तर वाट पाहत नाहीत ना, असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.





**खबरबात**
**नितीन देशमुख**

उरण येथे अतिरेकी आल्याची बातमी पसरली होती, तेव्हा पनवेल रेल्वे स्थानकावरील स्कॅनिंग मशीन सप्टेंबर २०१६पासून बंद असल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर हे मशीन पनवेल रेल्वेस्थानकामधून गायब झाल्याचे दिसून आले. याबाबत चौकशी केली असता तत्कालीन रेल्वे सुरक्षा बलाचे अधिकारी गोरबे यांनी सदर मशीन भंगारमध्ये निघल्याची माहिती दिली होती. नवीन मशीन अद्याप मिळाले नसल्याचे व कधी मिळेल हे सांगू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले होते. त्यालाही आज पाच वर्षे झाली आहेत. आज पुन्हा मुंबई रेल्वे दहशतवाद्यांच्या टार्गेटवर असल्याचे सांगण्यात येत असल्याने पनवेल रेल्वेस्थानकातील स्कॅनिंग मशीनचा विषय ऐरणीवर आला आहे.

पनवेल रेल्वेस्थानक हे मुंबईचे प्रवेशद्वार आहे. कोकण किनारपट्टीवरून अतिरेकी मुंबईत प्रवेश करू शकतात, याचा अनुभवही १९९२च्या मुंबई बॉम्बस्फोटाच्या वेळी आला आहे. या किनारपट्टीवर शस्त्र किंवा दारूगोळा उतरवण्याची शक्यता गुप्तहेर संघटनांकडून वारंवार सांगितली जाते. पनवेल स्टेशनवर बाहेरून येणाऱ्या आणि येथून देशात इतर ठिकाणी जाणाऱ्या गाड्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे या रेल्वेस्थानकावर कडक तपासणी होणे गरजेचे असताना आज या स्टेशनवर सुरक्षा व्यवस्था नसल्यातच जमा असते. पनवेल स्टेशनमधील ५, ६ व ७ नंबरच्या फलाटांवर लांब पल्ल्याच्या गाड्या येतात, तर एक ते चार क्रमांकाच्या फलाटांवरून लोकल गाड्या धावतात. स्टेशनमध्ये येण्यासाठी पूर्वेकडून म्हणजेच नवीन पनवेल आणि पश्चिमेकडून म्हणजेच पनवेलकडून प्रवेशद्वार आहेत. फलाट क्रमांक ५ वरील मेल गाड्यांच्या बुकिंग ऑफिसजवळील प्रवेशद्वारावर स्कॅनिंग मशीन होते. त्याचा उपयोग प्रवाशांचे सामान तपासण्यासाठी होत होता.

कोरोनापूर्वी पनवेल रेल्वेस्टेशनच्या फलाट क्रमांक १ ते ४ वरून रोज ३३३ लोकल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्स, ठाणे आणि अंधेरी अशा फेऱ्या होत होत्या. याशिवाय फलाट ५ ते ७ वरून मेल व एक्स्प्रेसच्या नियमित ५७ आणि तीन हॉलिडे एक्स्प्रेस गाड्या धावत होत्या. आजही अनेक लांब पल्ल्याच्या गाड्यांनी आणि लोकलने जाणाऱ्या प्रवाशांची संख्या लाखात आहे, मात्र स्कॅनिंग मशीन नसल्याने पनवेल स्टेशनमध्ये मोठमोठ्या बॅगा घेऊन येणाऱ्या संशयित प्रवाशांची कोणतीही तपासणी होताना दिसत नाही. या स्टेशनवर नेहमी मोबाइलमध्ये दंग असणारे पोलीस दिसतात. पोलिसांचे बॉम्बशोधक पथक मात्र नियमित ठराविक दिवसांनी स्टेशनवर येऊन जात असते. दिल्ली पोलिसांनी दहशतवादी पकडल्यावर मात्र पोलीस अचानक येऊन तपासणी करताना दिसतात.

पनवेल हे मध्य रेल्वेचे हार्बर लाईनवरील शेवटचे स्टेशन आहे. नैना प्रोजेक्ट आणि नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ यामुळे भविष्यात या स्टेशनला महत्त्व येणार असल्यानेच त्याचा विस्तार करण्याचे काम रेल्वे प्रशासनाने सुरू केले आहे. या स्टेशनचे महत्त्व आणि येथील प्रवाशांची संख्या पाहता अतिरेक्यांच्या हीटलिस्टवर हे स्टेशन असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. लाखो प्रवासी ये-जा करीत असलेल्या या स्टेशनवर प्रवाशांचे सामान स्कॅन करण्याचे मशीन लवकरच मिळणार की वराती मागून घोडे या म्हणीप्रमाणे रेल्वेचे अधिकारी एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच जागे होणार, असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.

# नेरळमध्ये एकाच रात्री नऊ दुकाने फोडली

**कर्जत : बातमीदार**

नेरळ रेल्वेस्थानकालगत कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या नऊ दुकानांमध्ये रविवारी (दि. १९) पहाटेच्या सुमारास चोरीच्या घटना घडल्या आहेत. सुट्ट्या पैशांची चिल्लर आणि खाद्यपदार्थ यांच्यावर चोरट्यांनी डल्ला मारला असून यामुळे नेरळ पोलिसांच्या कार्यक्षमतेबद्दल संभ्रम निर्माण झाला आहे.

कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्याच्या जागेवर मागील काही वर्षात अतिक्रमणे करून दुकाने थाटली आहेत. त्यापैकी चिराग बेंगल स्टोर, कोमल साडी सेंटर, बबलू टी स्टॉल आणि अन्य सहा अशा नऊ दुकानांमध्ये रविवारी पहाटे चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी लोखंडी हत्याराने शटर वाकवून या दुकानांमध्ये चोऱ्या केल्या आहेत. चोरट्यांनी त्या दुकानांमधून रोख रक्कम आणि खाद्यपदार्थ यांच्यावर ताव मारला आहे. याबाबत संबंधित दुकानदारांनी नेरळ पोलीस ठाण्यात जाऊन चोरीच्या घटनेची माहिती दिली.

पोलिसांनी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि रेल्वेस्थानक येथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांतील फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

# माथेरानमध्ये डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे फोटोग्राफरचा मृत्यू

**कर्जत, माथेरान : बातमीदार**

माथेरानमध्ये शारलेट लेक परिसरात पर्यटकांचे फोटो काढण्याचा व्यवसाय करणारे नकीम हकीम शेख यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तातडीने नगर परिषदेच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तेथे डॉक्टर उपस्थित नव्हते. त्यामुळे वेळेत उपचार न मिळाल्याने नकीम शेख यांना जीव गमवावा लागला.



शारलोट लेक या ठिकाणी नेहमीप्रमाणे आपला फोटोग्राफीचा व्यवसाय करून घरी आल्यावर नकीम शेख यांची तब्बेत अचानक बिघडली. त्यांना रुग्णालयात नेण्यासाठी रुग्णवाहिकाही वेळेत उपलब्ध होऊ शकली नाही. मित्र परिवाराने त्यांना हातरीक्षामधून नगर परिषदेच्या रुग्णालयात नेले, परंतु त्या ठिकाणी नव्याने रुजू झालेले डॉक्टर रॉय उपस्थित नव्हते. त्यामुळे नकीम यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथे नेण्यात अडचणी निर्माण झाल्या आणि माथेरानमध्येच त्यांनी आपले प्राण सोडले.

माथेरानमध्ये मोटार वाहनांना बंदी आहे. केवळ स्थानिकांच्या मागणीनुसार इथे तीन रुग्णवाहिका उपलब्ध आहेत, मात्र नकीम शेख यांना उपचारासाठी नेण्याकरिता तत्काळ वाहन मिळाले असते तर हॉस्पिटलपर्यंत वेळेत पोहचून त्यांचे प्राण कदाचित वाचले असते. त्यामुळे आरोग्य यंत्रणा नकीब यांच्या मृत्यूस कारणीभूत आहे, असा आरोप श्रमिक हातरिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे यांनी केला आहे.

**"नगर परिषद रुग्णालयातील डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे नकीम शेख यांच्यावर वेळेवर उपचार होऊ शकले नाहीत, ही बाब निषेधार्थ आहे. डॉ. रॉय यांना माथेरानला सेवा देणे अवघड असेल, तर तसा अहवाल स्थानिक प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांकडे द्यावा.**

**-योगेश जाधव, अध्यक्ष, माथेरान वन संरक्षण समिती**



# शिक्षणमहर्षी
## डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

रयतेमधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे. वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे. या काव्यपंक्तीप्रमाणे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य हे जगाच्या पाठीवरील महानतेचे प्रतिक आहे. आज २२ सप्टेंबर थोर शिक्षणतज्ज्ञ, समाजसुधारक कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३४वी जयंती.

या युगपुरुषाचा जन्म पायगोंडा पाटील आणि गंगाबाई पाटील या दाम्पत्याच्या पोटी कुंभोज गावी अश्विन शु. ५ ललिता पंचमी या दिवशी म्हणजे २२ सप्टेंबर १८८७ या शुभदिनी झाला. भाऊराव पायगोंडा पाटील यांच्या रूपाने एक देवदूत जन्माला आला. बहुजन समाजाच्या मुलांना शिक्षणाची कवाडे खुली केली. वसतिगृहयुक्त शिक्षणाची व्यवस्था करून अठरापगड जातीच्या मुलांना सहजीवनाचा मंत्र दिला. देशाभिमान, देशकल्याण, देशभक्ती यासाठी एका समर्पित साधुत्वाचा जन्म होता तो.

बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी पद्मभूषण डॉ. भाऊराव पाटील यांनी लावलेला वटवृक्ष प्रचंड वेगाने बहरतो आहे. त्यामध्ये रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई पाटील यांचा त्याग आणि समर्पण कधीही न विसरता येणारे आहे.

कर्मवीरांनी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाचा विचार पोहोचविला. महाराष्ट्रातील १४ व कर्नाटक राज्यातील १ अशा १५ जिल्ह्यांत ४३८ विद्यालये, ४२ महाविद्यालये, ३३ पूर्वप्राथमिक शाळा, ५१ प्राथमिक शाळा, ८ आश्रमशाळा, ७ अध्यापक विद्यालये, ९१ वसतिगृह, ७ प्रशासकीय कार्यालय, २ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, १ रयत इन्स्टी. ऑफ रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट सातारा, ५७ इतर अशा ७३७ शाखा कार्यरत आहेत.

डॉ. कर्मवीरांनी लावलेल्या शैक्षणिक रोपट्याचे रूपांतर आज वटवृक्षात झाले आहे. शैक्षणिक प्रसाराबरोबरच आधुनिक काळाला उपयुक्त असणारे शिक्षण संस्थेमार्फत दिले जात आहे. कर्मवीरांचे महानिर्वाण ९ मे १९५९ रोजी झाले. साताऱ्याचा वटवृक्ष उन्मळून पडला. भाऊरावांनी इहलोकची यात्रा संपवली होती. शिक्षणाच्या माध्यमातून समाज जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करून ज्ञानगंगा झोपडीपर्यंत पोहोचवणारे महामानव. सामान्य माणसांच्या जीवनात अभूतपूर्व कायापालट करून त्यांना माणूस म्हणून जगण्याची संजीवनी देणारे रयत शिक्षण संस्थेचे द्रष्टे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील. भाऊरावांसाठी असेच म्हणणे योग्य ठरेल-

**त्या चार भिंतीवर विलसे दिव्य समाधी,**
**हा रयतपुरीचा राजघाट हो त्यागी,**
**ही मूर्ती देवो स्फूर्ती सतत विरागी,**
**स्वर्गस्थ सुरांची पुष्पवृष्टी दिनरात,**
**तो अमर जाहला कर्मवीर जगतात.**
**।।जय कर्मवीर।।**

**-एच. एन. पाटील (उपशिक्षक)**
**तु. ह. वाजेकर विद्यालय, फुंडे**

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी जैन शेतकऱ्याच्या घरी झाला. कोल्हापूर येथे जैन वसतिगृहात आणि राजाराम हायस्कूलमध्ये शिकत असताना त्यांच्या मनावर थोर समाजसुधारक महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव पडला. आण्णा महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानत. त्यांनी कर्मवीर शिंदे यांना पूज्य व वंदनीय मानले. माता-पिता यांचे साधे, सात्त्विक व संयमी जीवन, सत्यनिष्ठा, निर्लोभता व सेवावृत्ती या गोष्टींचे सुसंस्कारी पाठ आण्णांना बालपणापासून मिळाले होते. प्रेम, मैत्री, अनुकंपा, निर्भयता, समदृष्टी, वात्सल्य, गंभीरता, क्षमा, दया, करुणा, उदारता, लोकप्रियता हे लोकोत्तर पुरुषातील गुण आण्णांच्या ठिकाणी आढळून येतात.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले (जि. सातारा) येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. १९२४ मध्ये संस्थेचे स्थलांतर सातारा येथे झाले. त्यांनी सातारा येथे मिश्र वसतिगृहाची स्थापना केली. सुरुवातीला आण्णांनी मुलांच्या वसतिगृहाची व जेवणाची व्यवस्था स्वतःच्या घरीच केली होती. आण्णांनी साताऱ्यामधील धनिणीची बाग खंडाच्या लिलावात मिळविली. १९२७ सालापासून आण्णा व सौ. लक्ष्मीबाई धनिणीच्या बागेत राहावयास आले. २५ फेब्रुवारी १९२७ रोजी महात्मा गांधींनी आण्णांच्या वसतिगृहास भेट दिली. गांधीजींनी या वसतिगृहाचे 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस-सातारा' असे नामकरण केले. आण्णांनी आपल्या आयुष्यात ग्रामीण शैक्षणिक कार्याचा जो प्रचंड वटवृक्ष उभा केला, त्याचे स्फूर्तिस्थान छत्रपती शाहू महाराज हे आहेत. शाहू बोर्डिंगचे कार्य सर्वांना आदर्श वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसला भेट दिली होती. ते म्हणतात, 'या वसतिगृहास भेट देऊ शकलो याबद्दल मला अत्यंत आनंद वाटतो, ही एक अद्वितीय संस्था आहे'. या भेटीनंतर, डॉ. आंबेडकर यांनी शाहू बोर्डिंगला देणगीही दिली.




कर्मवीर भाऊराव पाटील यांची मूळ कल्पना स्वावलंबी शिक्षणाची. सुरुवातीला आण्णांनी वसतिगृहे काढली, ते वसतिगृहाजवळ शेती घेत असत. वसतिगृहात राहायचे, स्वावलंबनाने शेती करायची आणि आजूबाजूच्या शाळेत जाऊन शिक्षण घ्यायचे. त्यानंतर आण्णांनी प्राथमिक व माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये, तसेच विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय व्हावी म्हणून ट्रेनिंग कॉलेजस काढली.

जून १९४७ मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी महाविद्यालय सुरू केले. श्रमाच्या मोबदल्यात मोफत उच्च शिक्षण द्यायचे हा प्रयोग आण्णांनी १९४७ मध्ये सुरू केला. आण्णांचा 'कमवा आणि शिका', 'स्वावलंबनाने कष्ट करून शिका' हा मंत्र अत्यंत मोलाचा आहे. 'कमवा आणि शिका' हे सूत्र अपूर्वाईचे आहे. आण्णांचे हे सूत्र मैलावरच्या दगडासारखे आहे. संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील म्हणतात, 'शैक्षणिक क्षेत्रातील कर्मवीरांच्या असामान्य कार्याचा गुणविशेष म्हणजे श्रमयोजना होय'. शिक्षण क्षेत्रामध्ये श्रमप्रतिष्ठेसाठी व्यवस्था सुरू करणे ही आण्णांची अभिनव कल्पना होती. या व्यवस्थेचा फायदा गरीब, गरजू, पददलित आणि शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना झाला. 'कमवा आणि शिका' योजनेस सार्वत्रिक मान्यता मिळाली. या योजनेमुळे शिक्षणाला एक नवीन परिमाण मिळाले. हेच कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे मर्म होय.

'कमवा आणि शिका' योजना छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये यशस्वीरीत्या राबवण्यात आली. या योजनेतून उच्च विद्याविभूषित झालेले काही विद्यार्थी राजकारण, समाजकारण या क्षेत्रात यशोशिखरावर पोहोचले. या योजनेतून, या वसतिगृहातून आदरणीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासारखा एक मोठा आधारस्तंभ या महाराष्ट्राला लाभला. रयत शिक्षण संस्थेच्या अनेक शाखा आणि शैक्षणिक संकुलांना आदरणीय रामशेठ ठाकूर यांनी कोट्यवधींची मदत केली आहे. एकदा ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे यांनी आदरणीय रामशेठ ठाकूर यांना एक प्रश्न विचारला होता, 'हा दातृत्वभाव आपल्यात कसा रुजला?' रामशेठ ठाकूर म्हणाले, 'माझे आई-वडील नेहमी दुसऱ्यांना मदत करीत असत. त्यांच्या उपयोगी पडत असत. त्यांचा हा परोपकारी संस्कार कळत न कळत हळूहळू माझ्या मनात रुजत गेला. पुढे सातारला रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. या कॉलेजचे प्रिन्सिपॉल एस. के. उनऊने हे प्रत्येक विद्यार्थ्याची काळजी घेत असत. त्यांना मदत करीत असत. अगदी अंगाला लावायच्या साबणापासून ते कुणाला अंगावर चादर आणण्यासाठी ते आर्थिक मदत करत. त्यांचा स्वभाव मला अगदी मनापासून भावला. नव्हे तो माझ्या हृदयाला भिडला. अगोदरच आई-वडिलांचे संस्कार माझ्या मनावर बिंबले होते व आता प्राचार्य उनऊने सरांच्या परोपकारी वृत्तीने हे संस्कार मनावर अधिक कोरले गेले.'

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बोलण्यात, वागण्यात अतिशय नम्रता होती. आण्णा, महर्षी शिंदे यांच्या भेटीस आले म्हणजे अतिशय अदबीने बोलत व अत्यंत आदर व्यक्त करीत. कसल्याही प्रकारचा अहंकार ते बाळगत नव्हते. आण्णा प्रत्येक काम प्रामाणिकपणे व निष्ठापूर्वक करीत. आण्णांना वाचनाची अतिशय आवड होती. वर्तमानपत्रे व समकालीन अनेक पुस्तकेही ते वाचत असत. चांगल्या कार्याला मदत करावी, मदत करताना सर्वांत पुढे असावे, उदारवृत्ती सदा असावी, असे ते नेहमी म्हणत. लोक बोलावून त्यांना देणगी देत. देणग्या गोळा करत असताना आण्णा गुणी माणसेही गोळा करीत असत. वसतिगृह चालविण्यासाठी पैसा जोडावा लागतो, परंतु वसतिगृह नेहमीच चांगल्या प्रकारे चालविण्यासाठी, विद्यार्थ्यांचे आयुष्य सुंदर करण्यासाठी असंख्य मित्र, असंख्य माणसंच जोडावी लागतात. चांगले मित्र, चांगली माणसं मिळणं हे सुद्धा भाग्य असतं. आण्णांनी स्वतःचे कार्यकर्ते घडविले. चिनी भाषेत एक म्हण आहे, 'तुम्हाला काही महिन्यांसाठी तरतूद करायची असेल, तर धान्य पेरा; काही वर्षांची तरतूद करायची असेल तर माणसे पेरा' कर्मवीर भाऊराव पाटील यांनी माणसे पेरली होती.

खेड्यातील शेतकरी, शेतमजूर आणि शहरातील हमाल, गिरणी कामगार यांनी आण्णांना नेहमीच मुक्त हस्ताने मदत केली आहे. राजे-राजवाडे आणि धनिक यांनीही स्वयंस्फूर्तीने भरीव स्वरूपाची बहुमोल मदत केली आहे.

'जे का रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुले' हा विशाल ध्येयवाद संत तुकाराम महाराज यांच्याप्रमाणे आण्णांच्याही मनात आणि जीवनात रुजलेला होता. गोंदवलेकर महाराज म्हणतात, 'माझ्याकरिता मी नसून मी लोकांकरिता आहे. माझ्याकरिता जग नसून मी जगाकरिता आहे' ही वृत्ती आपण सर्वांनी ठेवावी.

आज कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती, त्यांना आमचे विनम्र अभिवादन.

**-प्रा. डॉ. व्ही. एन. रणदिवे,**
**पनवेल (०२२-२७४६९२५५)**

# परतीच्या पावसाचा तयार भातपीकांना धोका

(छाया : अनिस मनियार)



पेण : प्रतिनिधी

हवामान विभागाने पुढील चार दिवसांसाठी जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे ८४ ते ९० दिवसांत तयार होणारी भातपिके संकटात सापडली आहेत. जोरदार अतिवृष्टी झाल्यास तयार झालेले भातपीक गारद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पेण तालुक्यातील ३४ हजार खातेदार शेतकऱ्यांनी सुमारे १२ हजार ८०० हेक्टर क्षेत्रावर भातपीक लागवड केली आहे. यामधील निमखाऱ्या शेतीमध्ये पाणी तुंबून राहत असल्याने जोरदार पावसात भातपिकाच्या डोईवरून पाणी गेल्यास तयार झालेले भातपीक कुजून नष्ट होण्याचा धोका आहे. सध्या उत्तरा व हस्त या दोन नक्षत्रांचा पाऊस बाकी असून, हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार मुसळधार पाऊस पडत आहे.

पेणमध्ये सरासरी १०६ टक्क्याहून अधिक पाऊस झाला आहे. या परिसरातील हेटवणे, आंबेघर, शहापाडा व प्रस्तावित बाळगंगा ही धरणे १०० टक्के भरली आहेत. अतिवृष्टी झाल्यास आपत्कालीन प्रसंगी धरणांचे दरवाजे उघडून ते पाणी नदी पात्रात सोडण्यात येईल. पेण तालुक्यातील नद्या तुडुंब वाहत आहेत. त्यात धरणातील पाणी सोडल्यास नदीकाठच्या परिसरात पाणी शिरून भातपीक पाण्याखाली येईल. सध्या भातपीक परिपक्व झाल्याने थोड्याच दिवसात कापणीचा हंगाम सुरू होणार आहे. अशा परिस्थितीत पाऊस धो-धो कोसळत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

दोन वर्षांपूर्वी झालेल्या फयान वादळाने जोरदार अतिवृष्टी होऊन पेण तालुक्यातील भातपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तीच परिस्थिती पुन्हा उद्भवण्याची चिन्हे दिसत असल्याने पेण तालुक्यातील शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.

**सध्या भातपीक परिपक्व झालेले नाही. हळव्या भात पिकांची काढणी व जोडणी एकाच वेळी केल्यास शेतीचे नुकसान होणार नाही. हवामान खात्याने वर्तविलेल्या पावसाच्या अंदाजानुसार शेतकऱ्यांनी आपले वेळापत्रक ठरविल्यास पिकांची हानी होणार नाही.**

**–अनिल रोकडे, तालुका कृषी अधिकारी, पेण**

# सावरोली–खारपाडा राज्यमार्ग धोकादायक



(छाया : विनायक माडपे)

खोपोली : प्रतिनिधी

पावसाळ्यात राज्यमार्गावर पडलेले खड्डे बुजवताना केलेल्या हलगर्जीपणामुळे सावरोली–खारपाडा मार्गावरचा प्रवास धोकादायक बनला आहे.

खालापूर तालुक्यातील महत्त्वाचा राज्यमार्ग असलेला सावरोली–खारपाडा रस्त्याचे काम कोट्यवधी रुपये खर्च करून तीन वर्षांपूर्वी करण्यात आले होते. रस्त्याची देखभाल आणि दुरुस्तीचा १० वर्षांचा कालावधी ठेकेदाराला देण्यात आला आहे, परंतु सध्या या रस्त्याची अवस्था पाहिली, तर ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याला वाळीत टाकले की काय, असा प्रश्न पडत आहे. पावसाळ्यात रस्त्याला अनेक ठिकाणी खड्डे पडले असून सततच्या वाहतुकीने खड्ड्याचा आकार वाढतच आहे. शिवाय सावरोलीपासून रस्त्यालगत गवताचे साम्राज्य झाल्यामुळे बाजूपट्टी शिल्लकच राहिलेली नाही.

सावरोली–खारपाडा या मार्गावर माडप गावाच्या हद्दीत पडलेले खड्डे बुजवताना खडी आणि डांबर टाकण्यात आली आहे, मात्र खड्डे बुजवताना टाकलेली डांबर आणि खडी यामुळे दीड फुटाचा उंचवटा तयार झाला आहे. त्यामुळे रस्ता अधिकच धोकादायक झाला असून दुचाकी घसरून अपघात घडत आहेत.

ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने जीवघेण्या अपघाताची प्रतीक्षा न करता योग्य ती खबरदारी घ्यावी आणि सावरोली–खारपाडा रस्ता समतल करावा, अशी मागणी प्रवासी करत आहेत.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अजय कुमार सर्वगौड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु ते बैठकीत असल्यामुळे याबाबत काय उपाययोजना करणार याची माहिती मिळाली नाही.

## एक्स्प्रेस वे वर ट्रकचा अपघात

खोपोली : प्रतिनिधी

एक्स्प्रेस वे वर मंगळवारी (दि. २१) पहाटे ट्रकचा भीषण अपघात झाला. त्यात चालक जखमी होऊन ट्रकमध्ये अडकून पडला होता. त्याला बाहेर काढून एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मुंबई–पुणे एक्स्प्रेस वे वरील खालापूर टोलनाका परिसरात मंगळवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास पुणे लेनवर ट्रकचा भीषण अपघात झाला. त्यात चालक ट्रकच्या केबिनमध्ये जखमी स्थितीत अडकून पडला होता. आपत्कालीन ग्रुपचे विजय भोसले, देवदूत यंत्रणा, आयआरबी पेट्रोलिंग, महामार्ग पोलीस, डेल्टा फोर्स यांच्या संयुक्त प्रयत्नांतून त्या चालकाला मोठ्या मेहनतीने बाहेर काढण्यात यश आले. त्यानंतर त्याला तातडीने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे महामार्ग पोलिसांनी सांगितले.



## माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदानाची प्रतीक्षा

मुरूड : प्रतिनिधी

शासनाकडून मिळणाऱ्या वेतनेतर अनुदानामधून शाळेची दुरुस्ती व अन्य घटकांवर खर्च केला जातो, मात्र मागील दोन वर्षांपासून वेतनेतर अनुदान मिळत नसल्याने रायगड जिल्ह्यातील माध्यमिक शाळांना इमारत दुरुस्ती व इतर बाबींवर खर्च कसा करावा, हा यक्ष प्रश्न सतावत आहे.

रायगड जिल्ह्यातील माध्यमिक शाळांना मागील दोन वर्षांपासून शासनाकडून वेतनेतर अनुदान प्राप्त झालेले नाही. रायगड जिल्ह्यात यंदा दोन मोठी वादळे आणि अतिवृष्टी झाल्याने अनेक शाळांची छपरे व कौले यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. लवकरच शाळा सुरू होणार आहेत. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची काळजी घेण्यासाठी प्रत्येक शाळेत विविध उपाययोजना करणे जरूरीचे आहे.

शाळा दुरुस्ती किंवा इतर बाबींसाठी माध्यमिक शाळांना शासनाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य मिळत नाही. त्यामुळे वेतनेतर अनुदानामधून शाळेची दुरुस्ती व अन्य घटकांवर खर्च केला जातो, मात्र गेल्या दोन वर्षांत रायगड जिल्ह्यातील माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान प्राप्त झालेले नाही. त्यामुळे राज्य शासनाकडून लवकरात लवकर वेतनेतर अनुदान मिळावे, अशी मागणी रायगड जिल्ह्यातील माध्यमिक शाळांकडून केली जात आहे.

## शिक्षक पात्रता परीक्षेच्या तारखेत बदल

अलिबाग : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणेमार्फत घेण्यात येणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आता ही परीक्षा ३१ ऑक्टोबर २१ रोजी होणार आहे.

पूर्वीच्या वेळापत्रकानुसार १० ऑक्टोबर रोजी ही परीक्षा होणार होती, मात्र याच दिवशी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा होणार आहे. त्यामुळे उमेदवारांचे नुकसान होऊ नये, यासाठी शिक्षक पात्रता परीक्षेच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आता ही परीक्षा ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे. प्रवेशपत्र ऑनलाईन काढून घेण्याची मुदत १४ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत असणार आहे, तर परीक्षेचा पहिला पेपर ३१ ऑक्टोबरला सकाळी आणि दुसरा पेपर दुपारी होणार आहे. याबाबतचे सुधारीत वेळापत्रक महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त तुकाराम सुपे यांच्यामार्फत जारी करण्यात आले आहे.


Rayat Shikshan Sanstha's

**Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel. District-Raigad.**

Post Box No. 124, Karanjade Village,
Tehsil- Panvel, District- Raigad. 410206
Ph. No. 022-27452561 Email: prinmpascpanvel@yahoo.co.in
Website: www.mpasccollege.edu.in

**Tender Notice**

The Principal, Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel invites tenders for the following Equipment through the website of **MKCL, http://edumart.sets.co.in**

| Equipment | Tentative Estimated Cost | Start Date | Last Date |
|---|---|---|---|
| Computer: Quantity-25<br>UPS: Quantity-25<br>Printer: Quantity-04<br>Projector: Quantity - 03<br>Anti-Virus: Quantity - 25<br>USB WiFi Dongle: Quantity - 15<br>Portable Hard Drive: Quantity - 02 | 10,5000/ | 23/09/2021 | 04/10/2021 |

For more details please refer **http://edumart.sets.co.in**

**sign/-**
**Principal**
Mahatma Phule A.S.C. College, Panvel

**sign/-**
**Secretary**
Rayat Shikshan Sanstha, Satara.


# खालापुरात ई–पीक पाहणीमध्ये नेटवर्कचा अडथळा

खोपोली : प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी ई–पीक पाहणी ॲप तयार करण्यात आले आहे, मात्र शेतावर काही ठिकाणी नेटवर्क मिळत नसल्याने हे ॲप गैरसोयीचे ठरत आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांनी पूर्वीप्रमाणेच तलाठ्याने शेतावर येऊन पीक पाहणी करावी, असे पत्र खालापूर तहसीलदारांना दिले आहे.

डिजिटल क्रांतीचा लाभ सध्या ज्या प्रमाणात शिक्षणात होत आहे तसा तो बळीराजालादेखील व्हावा या हेतूने पीक पाहणी ॲप विकसित करण्यात आले आहे. स्मार्ट मोबाइलद्वारे पीक पाहणी सहज करून शासनापर्यंत त्याची माहिती झटपट पोहोचावी असे तंत्रज्ञान तयार करण्यात आले आहे. यामध्ये वेळेचीदेखील बचत होणार असल्याने शेतकऱ्यांना सुलभ होणार होते. खालापूर तालुका दुर्गम भागात विखुरला असल्याने काही भागात नेटवर्क मिळण्यास होत असलेली अडचण यामुळे हे ॲप प्रभावीपणे काम करत नाही.

खालापूर तालुक्यातील वावंढळ येथील शेतीनिष्ठ शेतकरी सुरेश कदम यांची बागायती शेती असून आंबा, काजू, पेरू, चिकू, साग अशी लागवड आहे. पीक पाहणीसाठी वावंढळ तलाठी यांनी ॲपचा वापर करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे कदम यांनी शेतावर जाऊन ॲपचा वापर करण्याचा प्रयत्न केला, मात्र नेटवर्कमध्ये अडथळा येत असल्याने ॲप पूर्णपणे सक्रिय होत नाही. त्यामुळे त्यांची पीक पाहणी रखडली आहे.

पीक पाहणी वेळेवर न झाल्यास पीक विमा मिळण्यास अडचण येण्याची शक्यता असल्याने तलाठी यांनी शेतावर येऊन पीक पाहणी करावी, असे पत्र खालापूर तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी तहसीलदारांना दिले आहे.

### *अशी आहे पाहणीची पद्धत*

***स्मार्ट ई–पीक पाहणीत शेतावर जाऊन छायाचित्रासह शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीची सर्व्हे नंबरचा अक्षांश, रेखांशसह नोंद करायची आहे, मात्र नेटवर्क अडचण आणि स्मार्ट मोबाइल वापरण्याबाबतचे अज्ञान यामुळे ई–पीक पाहणी खालापूर तालुक्यात काही ठिकाणी बारगळली आहे.***

**ई–पीक पाहणीसाठी शेतकऱ्यांना ॲपच्या वापराबाबत सखोल माहिती देण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी अडचणी आल्यात त्या ठिकाणी पूर्वीच्या पद्धतीनेही पीक पाहणी करण्यात येत आहे.**

**–अर्चना सूळ–नारनवार, तालुका कृषी अधिकारी, खालापूर**

# ‘साहित्यसंपदा’तर्फे पुस्तक संजीवनी उपक्रम

पेण : रामप्रहर वृत्त

साहित्यसंपदा या आघाडीच्या साहित्यिक समूहातर्फे २४ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर दरम्यान पुस्तक संजीवनी उपक्रम राबविण्यात येणार आहे. वाचन प्रेरणा दिनानिमित्त सलग २१ दिवस चालणाऱ्या या उपक्रमाच्या माध्यमातून वाचकांना मला आवडलेले पुस्तक या शीर्षकाखाली आपल्याला आवडलेल्या पुस्तकाबद्दल मत मांडता येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून काळाच्या पडद्याआड गेलेली पुस्तके पुन्हा चर्चेत येतील, असा विश्वास व्यक्त होत आहे. वाचन प्रेरणा दिन हा फक्त एका दिवसापुरता मर्यादित न राहता तो उपक्रम निरंतर सुरूच राहावा, अशी अपेक्षा संस्थापक वैभव धनावडे यांनी व्यक्त केली आहे.

सध्या वाचनाचे महत्त्व कमी होत चाललेय असे दिसत असताना वाचन चळवळीस हातभार लागावा, तसेच विविध विषयांवरील पुस्तकांची ओळख समाजातील विविध घटकांना व्हावी या उद्देशाने साहित्यसंपदाने पुस्तक संजीवनी उपक्रमाची आखणी केली आहे. हा उपक्रम साखळी पद्धतीने पार पडणार आहे. एका वाचकाने आपले लिखाण पाठवताना दुसऱ्या वाचकास त्याच्या आवडत्या पुस्तकाबद्दल लिहिण्याचे आवाहन करायचे आहे. त्यासाठी आपण सदर व्यक्तीला तुमच्या पोस्टमध्ये टॅग करू शकता. कोणत्याही देशातील लेखकाच्या कोणत्याही भाषेतील पुस्तकाबद्दल व्यक्त होऊ शकता. एकाने कोणत्याही दोन पुस्तकांबद्दल लिहून पाठवू शकता. साहित्य पाठवताना आपण साहित्यसंपदा आयोजित पुस्तक संजीवनी उपक्रमासाठी असे सुरुवातीला नमूद करून साहित्यसंपदा फेसबुक समूहात पोस्ट करावे किंवा त्याची किमान पाच मिनिटांची ध्वनिचित्रफीत sahityasampda7nov18@gmail.com या ई–मेलवर पाठवावी. अधिक माहितीसाठी ९९३००८०३७५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Tender | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-15/ 2021-2022 | Installation, testing & Commissioning of 80MVAr, reactor(Bus) at 400kV R.S. Kharghar, under 400kV RS(O&M) Dn, Kharghar. **.......RFX No. 7000020980** | **Rs. 25.27 Lakhs** |

EMD 1% of estimated cost and Tender fee Rs.500/- + GST **Submission of bids from 22.09.2021 to 30.09.2021 up to 11.00 hrs, Bid opening date: 30.09.2021 if possible.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm.)
Tel. No. 022-27459624/25.

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


# किनाऱ्यावर वाहून आलेल्या मूर्तींचे पुनर्विसर्जन

मुरूड : प्रतिनिधी

१० दिवसांच्या मुरूड परिसरातील अनेक बाप्पांचे रविवारी समुद्र व एकदरा खाडीत विसर्जन करण्यात आले होते, मात्र त्यापैकी काही मूर्त्या सोमवारी (दि. २०) सकाळी किनाऱ्यावर वाहून आल्या होत्या. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या मुरूडमधील श्रीसदस्यांनी या मूर्त्या जमा करून त्यांचे खोल समुद्रात पुन्हा विसर्जन केले.

मुरूड परिसातील १० दिवसांच्या गणरायांचे रविवारी येथील समुद्रात आणि एकदरा खाडीत विसर्जन करण्यात आले होते. त्यापैकी ६५ मूर्त्या मुरूड समुद्रकिनारी आणि पाच गणेश मूर्त्या एकदरा खाडीकिनारी वाहून आल्याचे सोमवारी सकाळी आढळले.

धर्माधिकारी प्रतिष्ठानचा उपक्रम

रेवदंडा येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी व विश्वस्त सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मुरूडमधील सुमारे २५ श्रीसदस्यांनी या मूर्त्या एका होडीत जमा करून त्यांचे खोल समुद्रात विसर्जन केले.



(छाया : संजय करडे)


**नमुना एन. डी.**
(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH469753508 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. -------- चे मालक **अनंता मोतीराम पाटील** यांचे तारीख ०५/०५/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी श्री सागर अनंता पाटील, गोवा रोड, गावदेवी मंदिराजवळ, मुक्काम–तारा, पोस्ट–तारापाडा, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२२१ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सागर अनंता पाटील,**
**पत्ता – गोवा रोड, गावदेवी मंदिराजवळ, मुक्काम–तारा, पोस्ट–तारापाडा, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२२१**

